# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 04 October 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०४ ऑक्टोबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

आंध्र प्रदेशातल्या तिरुमला तिरुपती इथल्या श्री व्यंकटेश्वर स्वामी मंदिरात प्रसादाच्या लाडूमधल्या कथित भेसळ प्रकरणी स्वतंत्र विशेष तपास पथक – एसआयटी स्थापन करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं दिले आहेत. या पथकात केंद्रीय अन्वेषण विभाग – सीबीआयचे दोन अधिकारी, आंध्र प्रदेश पोलिस दलातले दोन कर्मचारी आणि भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाच्या अधिकार्यांचा समावेश असेल. यासंदर्भात आज झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयानं, याप्रकरणी आरोप – प्रत्यारोपांच्या आधारे कोणतंही निरीक्षण नोंदवलेलं नसून, न्यायालयाच्या निर्णयाला राजकीत रंग देऊ नये, असं स्पष्ट केलं आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या पाच ऑक्टोबरला राज्याच्या दौऱ्यावर येत आहेत. वाशिम इथं होणाऱ्या एका कार्यक्रमात पी.एम. किसान सन्मान निधी योजना आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजनांचे ऑगस्ट ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीतले अनुक्रमे १८ वा आणि पाचवा हप्ता मोदी यांच्या हस्ते वितरीत करण्यात येणार आहे.

त्यानंतर ठाणे इथं मुंबई मेट्रो लाईन तीन सह विविध विकास कामांचं उद्घाटन आणि लोकार्पण पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे. ठाणे महानगरपालिकेच्या नवीन इमारतीचं भूमीपूजन, नवी मुंबई विमानतळालगतच्या परिसरातल्या विविध कामांची सुरुवात यावेळी होणार आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पंतप्रधानांच्या या दौर्याचा आढावा घेऊन, कार्यक्रम स्थळांची पाहणी केली.

****

महाराष्ट्रातल्या बौद्ध धार्मिक स्थळं आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबंधित स्थळांचं आणि स्मारकांचा विकास करण्यात येणार असल्याचं, केंद्रीय मंत्री किरेन रिजीजू यांनी सांगितलं. नागपूर इथं आज दीक्षाभूमीचे दर्शन घेतल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. या स्थळांचा विकास करण्यासाठी संबंधित सामाजिक संस्था आणि शैक्षणिक संस्थांसोबत समन्वय साधण्यात येणार असल्याचं ते म्हणाले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेनेच आपलं सरकार काम करत असून, त्यांनी दाखवलेल्या मार्गावर मार्गक्रमण करत असल्याचं, रिजिजू यावेळी म्हणाले.

****

नाशिक इथं रेल्वे सुरक्षा बलाचा ४० वा स्थापना दिन कार्यक्रम आज रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत पार पडला. कार्यक्रमाच्या सुरवातीला वैष्णव यांनी रेल्वे सुरक्षा बल परेडचं निरीक्षण केलं.

****

काँग्रेस नेते आणि लोकसभेतले विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी आजपासून दोन दिवस कोल्हापूरच्या दौऱ्यावर येत आहेत. कसबा बावडा इथल्या भगवा चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण त्यांच्या हस्ते होणार असून, उद्या ते संविधान सन्मान संमेलनाला उपस्थित राहणार आहेत.

****

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत राज्यातल्या १ कोटी ९६ लाख ४३ हजार २०७ पात्र महिलांच्या खात्यात तिसऱ्या टप्प्यातली लाभाची रक्कम जमा झाल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात त्यांनी उर्वरित पात्र महिलांच्या खात्यातही लवकरच रक्कम जमा होईल, असं म्हटलं आहे.

****

लातूर जिल्हा परिषदेचा समाज कल्याण विभाग, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने क्रीडा संकुल इथं काल सेरेब्रल पाल्सी, बहुविकलांग, दिव्यांग मुलांसोबत चालण्याचा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमाला नागरिकांचा, दिव्यांग मुलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांनी यावेळी सेरेब्रल पाल्सी, दिव्यांग व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचं आवाहन केलं आहे.

****

खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये हमीभावाने मूग, उडीद, सोयाबीन खरेदीसाठी नांदेड जिल्ह्यात १३ खरेदी केंद्र निश्चितह करण्यात आली आहेत. सध्या ऑनलाईन नोंदणी सुरु असून, प्रत्यक्षात मुग, उडीद खरेदी दहा ऑक्टोबर पासून, तर सोयाबीन खरेदी १५ ऑक्टोबर पासून सुरू होणार आहे. मुखेड तालुक्यातल्या मुखेड, धनज, बेटमोगरा, जांब, किनवट तालुक्यातल्या गणेशपूर, देगलूर तालुक्यातल्या वन्नाळी, नायगाव तालुक्यातल्या रातोळी, हदगाव तालुक्यातल्या मानवाडी फाटा, याठिकाणी ही खरेदी केंद्र सुरु झाली आहेत.

****

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाअंतर्गत नांदेड जिल्ह्यातल्या सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींसाठी येत्या सोमवारी सात तारखेला मुदखेड आणि उमरी इथं उद्योग मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं आहे. जिल्ह्यातल्या पात्र, होतकरू, सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींनी सदर मेळाव्यास उपस्थित राहून, या योजनेचा लाभ घ्यावा, असं आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल इंगळे यांनी केलं आहे.

****

परभणी इथं विविध तपासणी केलेल्या ४ हजार ज्येष्ठ नागरिकांना विविध प्रकारच्या १७ हजार सहाय्यक साधनांचं आज मोफत वाटप करण्यात येणार आहे. एकाच मतदार संघात सर्वाधिक लाभार्थी असणारा हा देशभरातला पहिलाच उपक्रम असल्याची माहिती परभणीचे आमदार डॉ.राहुल पाटील यांनी दिली.

****

महिलांच्या आयसीसी टी-ट्वेंटी विश्व करंडक स्पर्धेत आज भारताचा सामना न्यूझीलंडसोबत होणार आहे. दुबई इथं होणारा हा सामना भारतीय वेळेनुसार संध्याकाळी साडे सात वाजता सुरु होईल. दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडिज दरम्यान देखील आज सामना होणार आहे.

****